**Lang. Code : 11**

इस पुस्तिका में **20** पृष्ठ हैं ।
This booklet contains **20** pages.

# AAT-20-II

**प्रश्न-पत्र II / PAPER II**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग IV & V / PART IV & V**

परीक्षा पुस्तिका संकेत
**Test Booklet Code**

**M**

परीक्षा पुस्तिका संख्या
**Test Booklet No.**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20)पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें । / For instructions in Marathi see Page 2 of this Booklet.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **M**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए ।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **M**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part -V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :
अनुक्रमांक : (अंकों में) ____________________
Roll Number : in figures
: (शब्दों में) ____________________
: in words
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :
परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________ निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature : Invigilator's Signature :
Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

**M**

**Lang. Code : 11**

# AAT-20-II

**चाचणी पुस्तिका कोड**

**M**

ही पुस्तिका 20 प्रष्ठ आहे.

**प्रश्नपत्रिका II**
**मराठी भाषा पुरवणी**
**भाग IV आणि V**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड M** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू**-2 वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग IV : भाषा – I (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग V : भाषा – II (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग IV मध्ये भाषा I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग V मध्ये भाषा II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा I व/वा भाषा II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग V (भाषा II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ____________________

: शब्दांमध्ये : ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________ पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120),** if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

## भाग – IV
## भाषा – I
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

भाषेवर केवळ प्रेम करून भाषा वा तिचा विचार समोर जात नसतो. अस्मिता व गौरव म्हणून भाषेच्या कार्यात समूहाच्या झेपेची गरज महत्त्वाची असते. आमच्या घरात मराठी दैनिके आग्रहाने दाखल व्हायला हवीत. मराठीच्या शाळा आणि मुलांच्या दप्तरांतील मराठी पुस्तकांची गुणवत्ता कायम उत्तम असली पाहिजे. शाळेतल्या मुलांना पाठ्यक्रम आणि भोवताल यात विसंगती जाणवू नये, ही धारणा शिक्षण आणि विचार यांची कायमच राहायला हवी. वळण आणि शिक्षण या नाण्याच्या दोन बाजू आहेत, या विचाराला बगल द्यायला नको. मराठीपण हे केवळ भाषिक नसते; तर भावना, भूमिका, लोक, व्यवहार, गरजा, आवडी, आदर या अशा नानाविध महत्त्वपूर्ण विषयांशी अनिवार्य स्वरूपात मराठीपण एकजीव झालेले असते.

भाषावापर आणि जनसामिलकी ही गोष्टच मुळी आदिम, व्यापक, सर्वस्पशी, अनिवार्य आहे. राज्याचे भाषाधोरण हे सूत्र घेऊनच लोकांपुढे आलेले आहे ! आजच्या दैनंदिन व्यवहारात भाषेचे अनेक घटक अंतर्ध्यान पावले आहेत. शेतांवर उभ्या असलेल्या लक्षावधी पुरुषांची भाषा आणि घरी अहर्निश श्रम करणाऱ्या स्त्रियांची भाषा आणि मोबाईल लँग्वेज यांच्यात भयंकर, पण भयसूचक अंतर आहे. या सर्व विपरीततेचा आणि विरोधाभासाचा विचार सर्व लोकांनी केला पाहिजे. मराठी शिक्षण नको, कारण शाळा धड नाहीत; असे म्हणून पालकांनी थांबू नये. तर, शाळा उत्तम होण्यासाठी पालकांचे शैक्षणिक, सामाजिक शाळास्तरांवरील सहभागीत्त्व विलक्षण वाढले पाहिजे. औषधांची केवळ माहिती नको. रोग आणि मूळ यांचा वेध आणि त्यावर जालीम उपायसुद्धा शोधले पाहिजेत. मराठी भाषिक चळवळीत हा विषय ऐरणीवर यायला हवा.

मराठी गाणं, मराठी भजन, मराठी अभंग, मराठी साहित्य, साहित्यातील आजचे विपुल लेखक व प्रवाह, बोलताचालता बहुआयामी मराठीसमृद्ध प्रत्येक माणूस यांची मराठी जगात कुठेच कमी नाही. इतर भाषेच्या तुलनेत ही मराठी अजिबात मागे नाही. हा स्वर आणि हा धागा मराठी धोरणाच्या मुळाशी आहे. लोकवाङ्मय, संत वाङ्मय, महानुभाव वाङ्मय, लोकसंगीत आणि कीर्तन व निरुपणाची, सर्जनाची, भाषेची मराठीची परंपरा श्रेष्ठतम आणि समृद्धच आहे. यातील मराठीचा प्रातिनिधिक, नवरसनिर्मित आणि लोकसामीलकीच्या पातळीवर आभाळभर, जमिनीची सर्व टोकं व्यापून असणारा मराठीचा विस्तार आहे. आणि म्हणूनच मराठीच्या या विस्ताराल इतिहास आणि समृद्धीचा देखणा वारसा लाभलेला आहे. कोट्यावधी मराठी माणसांच्या खांद्यांवर असणारी ही मराठीची पालखी आहे. तिचे धोरण निश्चित करण्याच्या प्रयत्नांतही मोठा जनसहभाग लाभावा.

**91. 'धोरण' या शब्दाचा आशय नसलेला पर्याय शोधा.**

(1) सारासार विचार

(2) वहिवाट

(3) काम करण्याची पद्धत

(4) एकाग्र चिंतन

**92. लेखकाच्या मते कोणत्या दोन बाबीत विरोधाभास आहे ?**

(1) लोकसमूहाची भाषा आणि मोबाईल लँग्वेज

(2) मराठी साहित्य आणि आजचे विपुल लेखन

(3) लोक सामीलकीं आणि मराठीचा विस्तार

(4) मुलांचे दप्तर आणि पाठ्यपुस्तकाची गुणवत्ता

**93. लेखकाच्या मते मराठी भाषिक चळवळीत अग्रक्रमावर असावयास बाबींपैकी विसंगत पर्याय शोधा.**

(1) पालकांचे सहभागित्त्व

(2) शाळांची गुणवत्ता

(3) नेमकी उपाययोजना

(4) पाठ्यक्रमातील विरोधाभास

**94. पुढीलपैकी भाववाचक नाम कोणते ?**

(1) मराठीपण

(2) कीर्तन

(3) पालखी

(4) भजन

**95. "आजचे <u>विपुल</u> लेखक व प्रवाह यांची मराठी जगात .." वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**

(1) सर्वनाम

(2) विशेषण

(3) भाववाचक नाम

(4) आत्मवाचक सर्वनाम

**96. लेखकाच्या मते कोणती वाब आपल्या घरात अनिवार्यपणे सामील झाली पाहिजे ?**

(1) मराठी पुस्तकांची गुणवत्ता

(2) मराठी दैनिके

(3) धारणा शिक्षण

(4) मोबाइल लँग्वेज

**97. आजच्या दैनंदिन व्यवहारात काय लोप पावले आहे, असे लेखकाला वाटते**

(1) समृद्धीचा वारसा

(2) मराठीचा इतिहास

(3) भाषेचे अनेक घटक

(4) कीर्तन व निरुपण

**98. 'वारसा' शब्दाचा समानार्थी आशय असलेला पर्याय निवडा.**

(1) पुनःपुन्हा

(2) वडिलोपार्जित हक्क

(3) निष्फळ बोलणे

(4) उत्तराधिकारी

**99. लेखकाच्या मते पालकांनी कोणती कृती करावी ?**

(1) शालेय पातळीवर त्यांचा सहभाग

(2) मराठीची पालखी वाहणे

(3) विपरीततेचा विचार

(4) विरोधाभासी विचार

**पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 साठी योग्य पर्याय निवडा.**

बलसागर भारत होवो । विश्वात शोभूनी राहो ।
हे कंकण करि बांधियले । जनसेवे जीवन दिधले ।
राष्ट्रार्थ प्राण हे उरले । मी सिद्ध मराया लाहो ।।

वैभवी देश चढवीन सर्वस्व त्यास अर्पिन
हा तिमीर घोर संहारिन या बंधु सहाय्याला हो ।।

हातात हात घेऊन हृदयात जोडून
ऐक्याचा मंत्र जपून या कार्य कराया लाहो ।।

करि दिव्य पताका घेऊ प्रिये भारत गीते गाऊ
विश्वात पराक्रम दावू, ही माय निजपदा लाहो ।।

या उठा करू हो शर्थ संपादु दिव्य पुरुषार्थ
हे जीवन ना तरि व्यर्थ भाग्य सूर्य तळपत राहो ।।

ही माय थोर होईल वैभव दिव्य शोभेल
जगतास शांति देईल तो सोन्याचा दिन येवो ।।

**100. पुढीलपैकी विशेषनाम कोणते ?**

(1) देश
(2) कंकण
(3) पताका
(4) सूर्य

**101. भारत देश विश्वात शोभून दिसावा या साठी कवीने त्याला काय करायला हवे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे ?**

(1) सिद्ध
(2) सशक्त
(3) संहारक
(4) भाग्यवान

**102. राष्ट्रासाठी नेमकं काय करण्याची सिद्धता कवी मनाची आहे ?**

(1) पराक्रम दाखवण्याची
(2) हातात हात घेण्याची
(3) प्राणार्पण करण्याची
(4) पुरुषार्थ बाळगण्याची

**103. भारत देश सामर्थ्यवान, वैभवशाली झाला, तर जगाला कोणता संदेश देईल असे कवीला वाटते ?**

(1) शांततेचा
(2) पराक्रमाचा
(3) पुरुषार्थाचा
(4) संहारकतेचा

**104. 'हातात हात घेऊन, हृदयास हृदय जोडून" या पंक्तीनून कवी कशाचे आवाहन करीत आहे ?**

(1) परस्पर बंधुभाव
(2) पराक्रम
(3) जनसेवा
(4) प्राणार्पण

**105. 'तिमीर' शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.**

(1) अंगार
(2) तिफण
(3) अंधःकार
(4) तमाशा

**(योग्य पर्याय निवडून प्र.क्र. 106 ते 120 यांची उत्तरे द्या)**

**106. प्रत्येक भाषेचे स्वतःचे आणि ... प्रकारचे व्याकरण असते.**

(1) नियमबद्ध

(2) राज्य शासनाप्रमाणे

(3) केंद्र शासनाप्रमाणे

(4) लिपिबद्ध

**107. त्रिभाषा सूत्रात तिसरी भाषा म्हणजे ...**

(1) देशपातळीवरची भाषा

(2) फक्त संस्कृत

(3) अहिंदी राज्यातील हिंदीशिवायची भाषा

(4) फक्त विदेशी/परकीय भाषा

**108. 'मुली वाचवा आणि मुली शिकवा' या संबंधीचा एक तक्ता शिक्षिका भिंतीवर लावते. ती मुलांना तक्ता नीट पाहण्यास आणि त्यावर एक लहानसा परिच्छेद लिहिण्यास सांगते. इये शिक्षिकेने वापरलेला तक्ता म्हणजे ....**

(1) अधिकृत सामग्री

(2) एकीकृत सामग्री

(3) विश्वसनीय सामग्री

(4) निरुपयोगी सामग्री

**109. ओघवता (Fluency) म्हणजे ..**

(1) अचूक लेखन.

(2) व्याकरणाच्या नियमांना नीट समजणे आणि वापरणे.

(3) वाक्यांचा नीट उच्चार करणे.

(4) बोलणे, वाचणे आणि लिहिणे यातून स्वतःला समाधानकारकपणे व्यक्त करणे.

**110. वाचनाची ऊर्ध्वगामी पद्धती यावर भर देते ...**

(a) ध्वनी

(b) शब्दांश

(c) वाक्य

(d) शब्द

(e) अक्षर

(1) a, d, e, b, c

(2) a, b, c, d, e

(3) a, e, b, d, c

(4) b, c, a, e, d

**111. भाषा आत्मसात करण्याच्या संदर्भात पुढीलपैकी कोणती बाब 'सामाजिक अन्योन्यक्रिया' सिद्धांतावर आधारित आहे ?**

(1) भाषा शिकणाऱ्यांना तुलनेत अधिक क्लिष्ट पातळीवर घेऊन जाणे.

(2) अभ्यासक्रमाला व्यापून टाकणाऱ्या भाषेचा आधार घेऊन शिक्षणावरभर दिला, तर भाषा शिकता येते.

(3) अनुकरण आणि प्रबलीकरण करण्याची संधी दिली, तर भाषा शिकता येते.

(4) भाषा शिकणाऱ्यांना इतरांशी संभाषण करण्याची संधी मिळाली पाहिजे.

**112. पूर्वकथन ही एक उपक्षमता आहे याचा संबंध कोणाशी आहे ?**

(1) आराखडा तयार करणे

(2) सारांश लिहिणे

(3) मुद्दे लिहिणे

(4) वाचन करणे

**113. जेव्हा विद्यार्थी उत्तम रोजगार मिळण्यासाठी भाषा शिकतात, तेव्हा त्यांची भाषा शिकण्याची प्रेरणा ... असते.**

(1) आंतरिक

(2) बाह्य

(3) रोजगार केंन्दी

(4) आत्मकेंन्द्री (ego centric)

**114. प्रभावी भाषा वर्गात शिकणाऱ्यांसाठी .... हा सर्वात महत्त्वाचा घटक ठरतो.**

(1) मूल्यमापन

(2) अनुकरण

(3) चर्चा

(4) चुका कमी करणे

**115. समावेशी वर्गात शिकवताना भाषा शिक्षकाने काय करावे ?**

(1) हुशार विद्यार्थ्यांना बेताच्या विद्यार्थ्यांची काळजी घेण्यास सांगणे.

(2) वेगवेगण्या अध्यापन पद्धतींचा वापर करून त्यांना शिक्षण प्रक्रियेत मदत करणे.

(3) प्राचार्यांना त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी खास शिक्षकाची नियुक्ती करण्यास सुचवणे.

(4) शाळेतील सहातास शांतपणे पसार करण्यास त्यांना सांगणे.

**116. भाषा निपुणतेच्या संदर्भात पुढीलपैकी कोणती बाब सर्वात महत्त्वाची आहे ?**

(1) निर्दोष उच्चारासह वाचन

(2) पाठाच्या शेवटी दिलेल्या लेखी प्रश्नांचा सराव करणे.

(3) अचूकता आणि ओघ विकसित करणे.

(4) अगदी कमी किंमतीचे किंवा जवळ–जवळ फुकट उपलब्ध असलेल्या शिक्षण साधनांचा वापर करणे.

**117. एक प्रभावी भाषा शिक्षकाने काय करावे ?**

(1) स्वतः बोलण्यात जादा वेळ घेणे

(2) विद्यार्थ्यांना जास्त बोलते करणे

(3) विद्यार्थ्यांना बोलण्याची कमी संधी देणे

(4) समूह कार्याला व जोडीने करणाऱ्या कार्याला कमी वेळ देणे.

**118. मुद्रित समृद्ध वातावरण हे कोणत्या दोन बाबींचा समावेशी भाग आहे ?**

(1) शाळा, वर्ग

(2) वाचन, स्वतः

(3) साक्षरता, भाषा

(4) स्वतः, सवंगडी

**119. 'बहुभाषिकता हे साधन आहे." म्हणजे ..**

(1) अनेक भाषा शिकणे.

(2) प्रत्येक शब्दाचा प्रतिशब्द मुलाच्या भाषेत सांगणे.

(3) अभ्यासक्रमाला व्यापून भाषा शिकणणे.

(4) मुलांच्या भाषेला एक साधन म्हणून वापरणे.

**120. तुमच्या वर्गात 'अंकित' हा दृष्टिबाधित विद्यार्थी आहे. एक भाषा शिक्षक या नात्याने तुम्ही काय कराल ?**

(1) विविध कार्यतक्त्यांवर भर देणे

(2) शिकवताना वेगवेगण्या प्रकारच्या दृष्यफिती वापरणार

(3) वेगवेगण्या प्रकारचे हावभाव आणि अंगविन्यास करणार

(4) स्वरशैलीसह बोलणे व स्पर्श आणि अनुभव करणाऱ्या साधनांचा वापर

परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150),** if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

## भाग – V
## भाषा – II
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्र. क. 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायाची निवडकटा.**

ज्याला ग्रंथसंग्रह असे सुंदर आणि भारदस्त नाव द्यावे असा पुस्तकांच साठा खरे तर माझ्यापाशी नाही आणि जी पुस्तके जवळ आहेत त्यांतही सातत्य राहिले नाही. म्हणजे असे, की अनेकदा माझा हा तथाकथित संग्रह बदलत राहिला आहे. काही पुस्तके विद्यार्थ्यांनी किंवा अतिप्रेमळ मित्रमैत्रिणींनी नेऊन परत न केल्यामुळे गायब झाली. काही जुनी पुस्तके मी स्वतःच काढून टाकली. पाण्यात भिजणे, वाळवी लागणे अशा नैसर्गिक आपत्तींनी काही पुस्तकांचा अकाल मृत्यू ओढवला. मुंबई सोडून मी पुण्याला आले तेव्हा त्या स्थलांतरात किती तरी पुस्तेक गेली. हे असे चाललेले असते. पण पुस्तके कमी होतात तशी वाढतही राहतात. काही उत्तम पुस्तके मी खरेदी करते. काही दुर्मिळ पुस्तके तर चक्क रस्त्याच्या कडेला मेणकापडावर पुस्तके अंथरून बसलेल्या विक्रेत्यांकडून मला मिळालेली आहेत. तात्पर्य, माझा ग्रंथसंग्रह वरकरणी यथावत दिसला, तरी आतून तो सारखा घडत, मोडत, पालटत, असतो. माझ्या त्या त्या वेळच्या अभिरुचीनुसारही काही बदल होत असतात. त्यामुळे नेमक्या कोणत्या ग्रंथसंग्रहाबद्दल लिहायचे हाच मुळी पहिला प्रश्न आहे.

माझ्या सुदैवाने ग्रंथांची संगत अगदी बालपणापासून मला लाभली आणि त्यामळे त्यांचे नुसते आसपास असणेदेखील केवढे आनंदमय असते, हे त्या वयापासून मला उमगले. माझ्या वडिलांना आणि आईलाही वाचनाचे अनोतान वेड होते. आईला थोडे अधिकच. मी आठ नऊ वर्षांची असेन, तेव्हा आमच्या घरी अनेक कादंबऱ्या, नाटके, भारतगौरव ग्रंथमाला, हिंद एजन्सीमाला, महाराष्ट्र कुटुंबमाला अशा मालांची पुस्तके होती. गडकरी, हरिभाऊ, देवल, किर्लोस्कर, खाडिलकर असे मातब्बर लेखक होते. गृहलक्ष्मी हे त्या काळातले प्रसिद्ध स्त्री जीवनविषयक मासिक माझ्या आईसाठी वडिलांनी मुद्दाम सुरू केले होते. नकळत्या वयात ही पुस्तके मी वाचली. पुन्हा माझ्या वाचनावर घरात कसलेही निर्बंध नव्हते. त्यामुळे थोर लेखकांच्या साहित्याबरोबरच मी इतरही काय काय वाचत असे. त्यात हडपांच्या कादंबऱ्यांपासून स्वामी शिवानंदांच्या तेव्हा गाजलेल्या पण संपूर्णतः अशास्त्रीय पुस्तकांपर्यंत आणि चार आणे मालेच्या रहस्यकथांपासून तो श्रीधर कवींच्या धार्मिक काव्यग्रंथांच्या गद्य अनुवादापर्यंत काय हवे ते आणि नको तेही मी मुक्तपणे वाचत असे. या बेशिस्त, पण भरमसाठ वाचनाने माझ्या वाचनप्रेमावर कायमचे शिक्कामोर्तब केले. आणि आपल्यापाशी इतर काही नसले तरी चालेल, पण पुस्तके मात्र हवीतच अशी मनाची धारणा होऊन बसली.

**121. 'उमगणे' या शब्दाचा समानार्थी पर्याय निवडा.**

(1) आकलन

(2) उमटणे

(3) उबग

(4) आश्वासन

**122. प्रस्तुत लेखात लेखिका कोणत्या महत्त्वपूर्ण बाबीबद्दल समाधान व्यक्त करते ?**

(1) वाचनप्रेम

(2) भारदस्त ग्रंथसंग्रह

(3) अभिरुची

(4) रहस्यकथा

**123. वडिलांनी आवर्जून सुरू केलेला उपक्रम कोणता ?**

(1) स्थलांतर कार्य

(2) गृहलक्ष्मीचा आरंभ

(3) धार्मिक काव्यग्रंथांचा अनुवाद

(4) पुस्तके नाहीशी करणे.

**124. 'भारदस्त' शब्दाचा विरुद्धार्थी आशय असलेला पर्याय निवडा.**

(1) सुंदर

(2) देखणा

(3) उच्च

(4) निम्न

**125. पुढीलपैकी विशेषनाम नसलेला पर्याय निवडा.**

(1) गृहलक्ष्मी

(2) ग्रंथसंग्रह

(3) गडकरी

(4) श्रीधर

**126. लेखिकेने तिच्या सतत परिवर्तनशील ग्रंथसंग्रहामागील सांगितलेल्या कारणांपैकी नसलेले कारण शोधा.**

(1) मित्रमैत्रिणींनी पुस्तके परत करणे

(2) जुनी पुस्तके निकालात काढणे

(3) नैसर्गिक आपत्तींमुळे

(4) रस्त्याच्या कडेला टाकल्यामुळे

**127. प्रस्तुत उताऱ्याच्या आधारे पुढीलपैकी चुकीचे विधान शोधा.**

(1) काही जुनी पुस्तके मी स्वतःच काढून टाकली.

(2) माझ्या वाचनावर घरात निर्बंध होते.

(3) पुस्तके मात्र हवीतच अशी मनाची धारणा झाली.

(4) नकळत्या वयात ही पुस्तके मी वाचली

**128. लेखिकेच्या आईला वडिलांच्या तुलनेत कोणत्या गोष्टीचा छंद होता ?**

(1) अनुवाद कार्य

(2) भारदस्तपणा

(3) स्थलांतर

(4) वाचन

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 साठी योग्य पर्याय निवड.**

'गरज ही शोधांची जननी होय', असं सुविख्यात वचनच आहे. माणसाच्या विविध गरजांतूनच त्याला नाना शोध लागले. जिज्ञासा, कुतूहल यांमधूनच विज्ञानाची प्रगती झाली. अनेक गूढ, अगम्य गोष्टींची उकल विज्ञानामुळेच झाली, त्यामागचा कार्यकारणभाव समजला; संशोधनाच्या पद्धती विकसित झाल्या; विज्ञानाच्या अनेक शाखा विकसित झाल्या आणि प्रगतीची अनेक क्षितिजं ओलांडून जणू अंतराळ देखील माणसाच्या कवेत आलं.

दुसऱ्या सहस्रकाच्या पूर्वार्धात (इ.स. 1001 ते 1500) शास्त्रज्ञांनी प्रामुख्याने खगोलशास्त्र, भूगोल, गणित आणि वैद्यक या मुलभूत क्षेत्रांमध्ये संशोधन केलं. विश्वाचं गूढ उकलणं व त्यातून मानवी प्रगतीला उपकारक असे उपक्रम राबवणं, अशा प्रामुख्याने दोन भूमिका शास्त्रज्ञांनी या काळात बजावल्या.

या सहस्रकाच्या उत्तरार्धात मात्र अनेक विज्ञानशाखा विकसित झाल्या–भूशास्त्र, भौतिकशास्त्र, वैद्यकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, अणुविज्ञान इत्यादी शाखांच्या विकासासोबत मनोवैद्यकशास्त्र, मानववंशशास्त्र या नव्या शाखांनाही गती प्राप्त झाली. गणित, भूमितीच्या क्षेत्रांतही लक्षणीय प्रगति झाली. वैद्यकशास्त्रात औषधोपचार शल्यचिकित्सेपासून ते अवयवरोपणापर्यंत संशोधकांनी मजल मारली.

एवढंच नव्हे, तर क्लोनिंगच्या निर्मितीपर्यंत त्यांनी झेप घेतली. दळणवळणाच्या क्षेत्रात जहाजं, रेल्वे, विमानं, रस्तेबांधणी, पूलबांधणी यायोगे भरीव प्रगती साध्य झाली. मुद्रणकलेत विलक्षण प्रगती झाली. संपर्कक्षेत्रात दूरध्वनीपासून मोबाईल, इंटरनेटपर्यंत क्रांती होऊन मानव माहितीयुगात पोहोचला. सहस्रकाच्या अखेरच्या टप्प्यात संगणकाद्वारे माहितीचं विश्वव्यापी जाळं निर्माण झालं आणि इतरही क्षेत्रांत आमूलाग्र बदल सुरू झाले. अंतराळात भरारी घेऊन मानवाने चंद्रावर पाऊल टाकलं आणि त्याची शोधयात्रा पुढे सुरूच आहे.

पण मानवजातीला उपकारक गोष्टींसोबतच संहारक कारणांसाठीही मानवाने विज्ञानाचा दुरुपयोग केला. दारूगोळ्यांपासून ते आण्विक–रासायनिक अस्त्रांपर्यंत अनेकविध अस्त्रं त्याने निर्माण केली. अस्त्रांमुळे अनेक विनाशकारी प्रसंग ओढवले; आणि या अस्त्रांमुळे मानवाच्या अस्तित्वापासून ते पूर्ण जीवसृष्टीलाही धोका निर्माण झाला. विज्ञानक्षेत्रातील महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी मानवाने पर्यावरणाच्याही गंभीर समस्या निर्माण केल्या.

एकंदरीत विज्ञानामुळे आपण कल्पनातीत प्रगती केली आणि संहारामुळे हतबुद्धही झालो. जीवन सुखकर केले आणि पर्यावरणाला धोकाही निर्माण केला. विज्ञानक्षेत्राचा असा भरगच्च प्रवास या सहस्रकात झाला.

**129. 'जिज्ञासा' शब्दाचा समानार्थी आशय नसलेला पर्याय निवडा.**

(1) कुतूहल

(2) शोधक बुद्धी

(3) जिकीर

(4) ज्ञानलालसा

**130. या हजारवर्षांच्या दुसऱ्या टप्प्यात कोणती नवी विज्ञान शाखा विकसित झाली नाही ?**

(1) अणुविज्ञान

(2) मनोवैद्यक शास्त्र

(3) भूशास्त्र

(4) खगोलशास्त्र

**131. विज्ञानक्षेत्रातील कोणत्या गोष्टीमुळे आपण हतबुद्ध झालो असे लेखकाला वाटते ?**

(1) संहारकता

(2) जिज्ञासा

(3) आमूलाग्र बदल

(4) विविध ज्ञानशाखांचा विकास

**132. पुढील पर्यायांपैकी विशेषनाम शोधा.**

(1) जहाज

(2) विमान

(3) चंद्र

(4) रस्ता

**133. पुढीलपैकी कोणती बाब आवागमनाशी संबंधित नाही ?**

(1) रस्तेबांधणी

(2) पुलबांधणी

(3) दारूगोळा निर्मिती

(4) उड्डाण पुल

**134. "मुद्रणकलेत विलक्षण प्रगती झाली." या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात शोधा.**

(1) सर्वनाम

(2) विशेषनाम

(3) क्रियापद

(4) विशेषण

**135. लेखकाच्या मते कोणत्या दोन महत्त्वाच्या सकारात्मक कृती या काळात शास्त्रज्ञांनी राबविल्या ?**

(1) अनेकविध शस्त्रास्त्रं व जीवसृष्टीला धोका

(2) विनाशकारी घटना व पर्यावरणीय समस्या

(3) विश्वाचा बोध व मानवी प्रगतीला अनुकूल उपक्रम

(4) विज्ञानक्षेत्रातील अतिमहत्त्वाकांक्षा व व्यापक संहार

(योग्य पर्यायाची निवड करून उत्तरे द्या प्र.क्र. 136 ते 150)

**136. एखादा पाठ शिकवल्यानंतर वर्ग शिक्षिका मुलांना पाठातील नामांचे विविध प्रकार (सामान्य नाम, विशेष नाम इत्यादी) शोधण्यास सांगते. आणि त्यांना निर्दिष्ट रकान्यात लिहिण्यास सांगते. असे करणे म्हणजे ....**

(1) व्याकरण नियमांची घोकंपट्टी

(2) व्याकरण शिक्षण

(3) व्याकरण भाषांतर पद्धती

(4) ससंदर्भ व्याकरण

**137. पुढीलपैकी कोणती बाब 'अर्धचेतनावस्थेची प्रक्रिया असून मुलं त्याचा संभाषणासाठी वापर करतात ?**

(1) भाषा शिकणे

(2) भाषा आत्मसात करणे

(3) व्दितीय भाषा

(4) भाषिक सामर्थ्य

**138. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी एक भाषा शिक्षक म्हणून तुम्ही काय कराल ?**

(1) त्यांना पाठ्यपुस्तक वाचण्यास सांगणे

(2) त्यांना पाठाचा सारांश पाठ करण्यास सांगणे

(3) मुलांच्या वयाला अनुरूप बालसाहित्याचा वापर करणे. ज्यामुळे त्यांना वाचनाची गोडी लागेल.

(4) पाठाचे त्यांच्या भाषेत भाषांतर करून त्यांना प्रश्नांची उत्तरे पाठ करण्यास सांगणे.

**139. मुलांची भाषा शिकण्याची पातळी तपासून पाहण्यास पुढीलपैकी कोणती बाब मदतरूप ठरेल ?**

(1) मुलांना त्यांनी पाठ केलेली कविता साभिनय म्हणण्यास सांगणे.

(2) पाठाचे मातृभाषेत भाषांतर करण्यास सांगणे.

(3) त्यांना त्यांचे विचार आणि कल्पना मुक्तपणे व्यक्त करण्याची संधी देणे.

(4) कवितेतील काव्यात्म क्लुप्ती शोधण्यास सांगणे.

**140. पाठाशी संबंधित मजकुराच्या आधारे विद्यार्थी मजकुराचा नेमका अर्थ शोधतात आणि वाक्य, शब्दबंध आणि शब्दांच्या आधारे निर्माण होणाऱ्या मजकुराला समजतात. मजकुराचा याप्रकारे अन्वयार्थ लावणे म्हणजे ...**

(1) ऊर्ध्वगामी उपकौशल्य

(2) अधोगामी उपकौशल्य

(3) समग्र भाषा पद्धती

(4) समाकलित पद्धती

**141. मुलांना त्यांच्या भाषिक विकासाच्या बाबतीत प्रतिसंभरण (Feedback) देण्यासाठी कोणती बाब सर्वात परिणामकारक आहे ?**

(1) शिक्षकांनी मुलांच्या चुका लगेच त्यांच्या ध्यानात आणून देणे.

(2) फक्त त्याच मुलांना प्रतिसंभरण (feedback) देणे ज्यांचा भाषिक वापर कमकुवत आहे.

(3) शिक्षकांनी त्यांच्या चुकांचे मूल्यमापन करून त्यांच्या मातृभाषेची पार्श्वभूमी विचारात न घेता. चुकांना दुरुस्त करण्याची पद्धति विकसित करणे.

(4) मुलांना त्यांच्या चुका निदर्शनास आणून दिलेल्या आवडणार नाही; असे समजून त्यांच्या चुकांकडे दुर्लक्ष करणे.

**142. पाठ्यपुस्तकाच्या पलिकडे जाणे म्हणजे ....**

(1) पाठ्यपुस्तकाच्या पातळीपेक्षा वरच्या दर्जाचे अध्यापन

(2) पाठ्यपुस्तककाच्या व्यतिरिक्त जादा साधन सामग्री उपलब्ध करून देणे.

(3) संपूर्ण पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करून घेणे गरजेचे नाही.

(4) पाठ्यपुस्तकाची काठिण्य-पातळी विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेच्या पलिकड़ची असणे.

**143. भाषेचा पाठ शिकवताना शिक्षिका विज्ञान आणी सामाजिक शास्त्रातील पाठांचाचाही वापर करते आणि मुलांना तो वाचण्यास सांगते कारण त्यातील भाग भाषेशी संबंधित आहे. असे करणे म्हणजे ...**

(1) अंतर्विद्याशाखीय पद्धत

(2) पाठ्यक्रमव्याप्त भाषा

(3) बहुपदरी भाषा शिक्षण

(4) विषय-भाषा शिक्षण

**144. कोणत्या गोष्टीचे सबलीकरण करून संभाषण कौशल्य चांगल्याप्रकारे विकसित करता येते ?**

(1) गुंतागुंतीची अवघड संहितेचे वाचन

(2) शिक्षकाच्या आदर्श उच्चारांचे श्रवण

(3) वास्तव जीवन परिस्थितीत संभाषण

(4) बोलताना चुका करणे टाळणे

**145. व्याकरण शिकल्यामुळे विद्यार्थ्यांची कोणती बाब सुधारते ?**

(1) साक्षरता

(2) अचूकता

(3) ओघ

(4) शब्दसंग्रह

**146. भाषा शिक्षिका मुलांना आपल्या शेजारी बसलेल्या मुलाला 'एक पावसाळी दिवस' यावर आपले अनुभव कथन करण्यास सांगते. असे करण्यास सांगणे म्हणजे ...**

(1) मुले अनुभव सांगत असताना वर्गात गोंगाट निर्माण करणे.

(2) मुलांच्या मौखिक विचार मांडण्याच्या क्षमतेत वाढ करणे.

(3) वर्गात गैरशिस्त निर्माण करणे.

(4) पाठ्यपुस्तक वाचनातून निर्माण होणारा वैताग घालवणे.

**147. लेखनाच्या प्रक्रिया पद्धतींत (Process approach) कोणती बाब समाविष्ट असते ?**

(a) संपादन

(b) बुद्धिमंथन

(c) उजळणी

(d) आराखडा

(1) a, b, c, d

(2) b, c, a, d

(3) a, d, c, b

(4) b, d, c, a

**148. वर्गशिक्षिका मुलांना आपल्या संचयिकेतील पाच चांगल्या वस्तू सोडून बाकीच्या वस्तूंना काढून टाकण्यास सांगते. यानंतर ती मुलांना त्या पाच वस्तूंबद्दल बोलण्यास सांगते. असे करणे म्हणजे ....**

(1) सवंगड्याने केलेले मूल्यमापन

(2) स्व–मूल्यमापन

(3) शिक्षकाने केलेले मूल्यमापन

(4) सारांशीकृत मूल्यमापन

**149. प्राथमिक पातळीवर भाषा शिकण्याच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते साधन सर्वात महत्त्वाचे आहे ?**

(1) बाल साहित्य

(2) वर्तमान पत्र

(3) संगणक

(4) रेलिया (Realia)

**150. मुलांमध्ये मौखिक क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने कोणती बाब सर्वात कमी महत्त्वाची आहे ?**

(1) वस्तूंचा परिचय करून देणे

(2) त्यांच्या शब्दांत गोष्ट सांगणे.

(3) शिक्षकाच्या पाठोपाठ गोष्ट सांगता येणे.

(4) एखादी घटना वर्णन करणे.

## SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/विची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें ।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **काले/नीले बॉल पॉइन्ट पेन** से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
5. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी । इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए ।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्वीच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए । इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और उनके विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित ।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा । **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान हाज़िरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ ।**
12. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल / कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें । परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।**

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY:**

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Black/Blue Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/ room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/ rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against them including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his / her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/ Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***